## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७७८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/११/२०१७

**१)महिलेच्या गळयातील सोन्याची काळी पोत जबरीने चोरून नेण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २१/११/२०१७ चे १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी हा फिर्यादीचे घरी पाणी पिण्याचे बहाण्याने गेला व फिर्यादीचा गळा पकडुन जबरीने गळयातील सोन्याची काळी पोत जबरीने चोरून नेण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी श्रीमती मंजुळा श्रीपत राऊत वय ६७ वर्ष रा.हनुमान वार्ड वरठी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३९३ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. फुंडे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) चारचाकी वाहनाच्या धडकेत तिन जखमी :–**

दिनांक २१/११/२०१७ चे १०.०० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी हा त्याचे पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ४० एजी ८५९२ ने सिल्ली आंबाडी रोडने जात असता, समोरून येणाऱ्या यातील आरोपी टाटा सुमो चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन आमोरा समोर धडक देवुन फिर्यादीस गंभिर जखमी करण्यास व सुमो गाडीत बसलेल्या तिन इसमांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी तेजराम अशोक ठोबळे वय २३ वर्ष रा. सिल्ली याचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भा.दं.वी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बहादुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत एकाचा मृत्यु व एक जखमी :–**

दिनांक २१/११/२०१७ चे १७.३० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी किरण गंगाधर व्यवहारे वय ५१ वर्ष रा. नरकेसारी वार्ड खामतलाव वार्ड भंडारा याची मानलेली बहीन मृतक सौ. मिरा अन्नाजी घोट वय ५१ वर्ष ही तिची जुपीटर मोटार सायकल क्र. एमएच ३६ डब्लु २२०४ व मागे जखमी शिक्षीका यादव मॅडम हिला डबल सिट बसवुन मानेगाव वरून सिल्ली मार्गे भंडारा येथे येत असतांना समोरून येणाऱ्या मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव, निष्काळजीपणे चालवुन मृतक हिचे जुपीटर गाडीला धडक दिली त्यामुळे फिर्यादीची मानलेली बहीन मृतक ही गंभिर जखमी होवुन तिचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३०४ (अ) भा.दं.वी. सहकलम १४३/१७७,१८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी लाडे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**४) बिना रॉयल्टी रेतीची चोरून नेतांनी मिळुन आल्याने दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २१/११/२०१७ चे १९.१५ वाजता. दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील बिना नंबरचा ट्रॅक्टर व निळया रंगाची ट्रॉली क्र. एमएच ३४ एल ६०६९ ज्यात बिना रॉयल्टी १ ब्रास रेतीने भरलेली किमती २,०००/रु चोरून नेतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोशी. तिजारे यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३७९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा शेंडे पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

५) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २१/११/२०१७ चे १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मॅक्स गाडी ही दवाखाना चौक गोबरवाही येथे आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. इंगोले यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. इंगोले पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

६) अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी . :–

दिनांक २१/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, तुमसर व लाखनी येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १४ लिटर हातभट्टी दारू किंमती १,४००/–रू तसेच जुगारातुन किंमती ६००५/–रु असा एकुण किंमती ७,४०५/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २१/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०७ तीन सिटर वाहनांवरती १५ केसेस व ईतर वाहनांवरती १०६ केसेस करण्यात आलेले आहे.

(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.